सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज 307 ठ. क्र. 300
दि. 29/12/16 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



भारतीय चौक ते विजापूर वेस चौक पर्यत ४५० मि.मि (१८इंच )व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन घालणे कामी प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयांकित कामाचे पूर्वगणनपत्रक २०१६-१७ र.रू ४६,७२,२००/- इतक्या रकमेस बजेट तरतूद होणेस तसेच सदर पूर्वगणनपत्रकास मंजुरी मिळणेस्तव प्रकरण मा. सर्वसाधारण सभेकडे प्रस्ताव सादर करणेस मा.आयुक्त यांचे दि.१९/११/२०१६ चे टिपणीने आलेले प्रकरणाचे अवलोकन केले.

याकामी पूर्वगणनपत्रकास मान्यता देणेत येत आहे.सन २०१७-१८ मधील अंदाजपत्रकाततरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज 309 ठ. क्र.....309
दि. 29/12/16.... रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



श्री.सिध्देश्वर सहकारी साखर कारखाना लि.कुमठे.जि-सोलापूर या कारखान्याच्या सामान्य बिगर उत्पादक सभासदांनी (सहकारी संस्था सहित) निवडून द्यावयाच्या संचालक पदासाठी ठराव पाठविणे कामी प्रस्तावात नमूद कारणास्तव निवडणूक निर्णय अधिकारी यांनी पत्रात नमूद केल्याप्रमाणे या संस्थेचे चेअरमन अथवा अध्यक्ष अथवा मुख्य कार्यकारी अधिकारी अथवा संचालक मंडळ यापैकी एकाचे नांव निवडणुकीत भाग घेण्यासाठी व मतदान करण्यासाठी निवडणूक निर्णय निर्णय अधिकारी यांचे कारखाना कार्यस्थळावरील कार्यालयात त्यांचे पत्रात नमूद केल्याप्रमाणे पाठविणेकरिता सदरची बाब मा.सर्वसाधरण सभे पुढे निर्णयास्तव ठेवणे कामी मा.आयुक्त यांचे दि.३/१२/२०१६ च्या टिपणीने आलेले प्रकरणाचे अवलोकन केले.

मा.महापौर,सोलापूर महानगरपालिका यांचे नांव संबंधिताकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.390.ठ. क्र...302
दि.29/12/16....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

३१०

सोलापूर शहरातील सध्याचे असलेले स्ट्रीट लाईट काढून एल.ई.डी. स्ट्रीट लाईल बसवणे बाबत धोरणात्मक मान्यता मिळणेस्तव प्रस्तावात नमूद कारणास्तव व प्रस्तावात नमूद केले प्रमाणे सदरची योजना मे. एनर्जी एफिशिएसी सर्व्हिसेस लिमिटेड कंपनीकडून अथवा DIEFFERED PAYMENT च्या अनुषंगाने निवीदा प्रक्रिया करून योजना राबविणे बाबत धोरणात्मक निर्णय होऊन मिळणेस व प्रकरणी मा.सर्वसाधरण सभेची मान्यता मिळणेकामी मा.आयुक्त यांचे दि.२५/११/२०१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

EESL ही केंद्र शासन अंगीकृत कंपनी आहे. त्यामुळे त्यांच्याकडून स्मार्ट सिटी एरिया मधील LED फिटींग व तद्अनुषंगिक कामे करण्याचे नियोजन करावे व त्याअनुषंगाने करारपत्र व पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार मा. आयुक्तांना देण्यात येत आहे.व उर्वरित ठिकाणचे स्ट्रीट लाईट फिटींग काढून LED फिटींग बसविण्याचे कामाचे ESCO मॉडेल चे DPR बरविण्यात यावे. व सदरच्या DPR मध्ये थर्ड पार्टी एनर्जी ऑडीटचा समाविष्ठ असावे तसेच त्यामध्ये हदद्वाढ भागामध्ये ज्या ठिकाणी स्ट्रीट लाईट नाहीत त्या ठिकाणी बसविण्याचा कामाचा समाविष्ठ असावा. सदर DPR ची फी LED बसविणा-या मक्तेदाराकडून अदा करण्यात यावी.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका